दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●सहसंपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०२ अंक-०४ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, ५ मे २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

निवासी डॉक्टरांवरील हल्ल्यानंतर सुरक्षा व्यवस्था भक्कम करण्यासाठी 'केंद्रीय मार्ड'चे राज्य सरकारला पत्र

■ **मुंबई, यश सावंत :**

गेल्या दीड वर्षामध्ये राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नऊ वेळा निवासी डॉक्टरांवर हल्ले करण्यात आले असून या घटनांमुळे रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामध्ये निवासी डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्यामुळे चिंता व्यक्त होऊ लागली आहे. या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील निवासी डॉक्टरांना पुरविण्यात येणारी सुरक्षा व्यवस्था अधिक भक्कम करण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र केंद्रीय मार्डने राज्य सरकारला पाठवले आहे. अकोला येथील ३ मे २०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात शस्त्रक्रिया करणाऱ्या निवासी डॉक्टरांवर रुग्णांच्या नातेवाईकांकडून हल्ला केला. राज्यातील आठ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वर्षभरामध्ये रुग्णांच्या नातेवाईकांनी हल्ले केले आहेत. डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्यावर हल्ले होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत आहे. मागील वर्षी जानेवारीमध्ये यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांवर हल्ला करण्यात आला होता. त्यानंतर चंद्रपूरमध्ये मे आणि सप्टेंबरमध्ये दोन वेळा हल्ले झाले. डिसेंबर २०२३ मध्ये पिंपरी येथील वैद्यकीय महाविद्यालयात, २९ जानेवारी २०२४ मध्ये पुन्हा चंद्रपूरमध्ये, ४ मार्च २०२४ रोजी पिंपरी वैद्यकीय महाविद्यालयात, १९ एप्रिल २०२४ मध्ये अकोला येथे, २१ एप्रिल २०२४ रोजी संभाजी नगर आणि ३ मे २०२४ रोजी अकोला वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरांवर हल्ला करण्यात आला होता. जानेवारी २०२३ पासून आतापर्यंत निवासी डॉक्टरांवर तब्बल नऊ वेळा हल्ले करण्यात आले आहेत. निवासी डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यांचा परिणाम डॉक्टरांच्या शैक्षणिक प्रगतीवरही होत असतो. हे वातावरण डॉक्टरांच्या विकासासाठी घातक असते. परिणामी, भविष्यात डॉक्टरांना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळावे यासाठी त्यांना पुरेशी सुरक्षा व्यवस्था पुरविणे आवश्यक आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये सुरक्षा उपाय अधिक भक्कम करावी, जेणेकरून निवासी डॉक्टरांवरील पुढील हल्ले थांबवता येऊ शकतात, असे पत्र केंद्रीय मार्डने वैद्यकीय शिक्षण मंत्री, गृहमंत्री, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक आणि राज्यातील सर्व सरकारी व खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठाता आदींना पाठवले आहे.

अटकेचे तपशील द्या! 'जीएसटी'अंतर्गत केलेल्या कारवाईबाबत सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

■ **नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

वस्तू आणि सेवा कराअंतर्गत (जीएसटी) बजावण्यात आलेल्या नोटिसा आणि केलेल्या अटक यांच्याबद्दलचा डेटा सादर करा असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. यामुळे कायद्याचा अर्थ लावला जाईल आणि नागरिकांचे स्वातंत्र्य हिरावून त्यांचा छळ टाळण्यासाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली जातील असे न्यायालयाने नमूद केले आहे. या प्रकरणाची गुरुवारी सुनावणी झाली.

'जीएसटी' कायदा, सीमाशुल्क कायदा आणि आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) या कायद्यांच्या विविध तरतुदींना आव्हान देणाऱ्या एकूण २८१ याचिकांवर न्या. संजीव खन्ना, न्या. एम एम सुंद्रेश आणि न्या. बेला एम त्रिवेदी यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. सुनावणीदरम्यान विशेष खंडपीठाने ह्यजीएसटीह्ण कायद्याच्या कलम ६९च्या संदिग्धतेविषयी चिंता व्यक्त केली. हे कलम अटक करण्याच्या अधिकाराविषयी आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, गरज पडल्यास नागरिकांचे स्वातंत्र्य मजबूत करण्यासाठी कायद्याचा अर्थ लावला जाईल पण नागरिकांचा छळ होऊ देणार नाही.

''एक कोटी रुपये ते पाच कोटी रुपयांपर्यंत कथित थकबाकी असल्याबद्दल गेल्या तीन वर्षांमध्ये जीएसटी कायद्याअंतर्गत बजावण्यात आलेल्या नोटिसा आणि केलेल्या अटक याबद्दलचा डेटा द्या. लोकांचा छळ होऊ शकतो आणि तो आम्ही होऊ देऊ शकत नाही. तरतुदीमध्ये काही संदिग्धता आहे असे आम्हाला आढळले तर आम्ही ती दुरुस्त करू. दुसरे म्हणजे, या सर्व प्रकरणांमध्ये लोकांना तुरुंगात टाकले जाऊ शकत नाही'', असे विशेष खंडपीठाने केंद्र सरकारची बाजू मांडणारे अतिरिक्त महान्यायअभिकर्ता एस व्ही राजू यांना सांगितले.

काही याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथ्रा यांनी जीएसटीअंतर्गत अधिकाऱ्यांकडून अधिकारांचा कथितरित्या गैरवापर होत असल्याचे न्यायालयाला सांगितले. यामुळे व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा संकोच होत असल्याचा दावा त्यांनी केला. ते म्हणाले की कधीकधी अटक केली जात नाही, पण लोकांना नोटिसा बजावून, अटकेची भीती दाखवून त्यांचा छळ केला जातो. अतिरिक्त महान्यायअभिकर्ता राजू यांनी न्यायालयाला सांगितले की, केंद्रीय जीएसटी कायद्याअंतर्गत बजावलेल्या नोटिसा आणि केलेल्या अटक यासंबंधी डेटा संकलित केला जाईल. पण राज्यांशी संबंधित अशी माहिती एकत्र करणे कठीण असेल. त्यावर, आम्हाला सर्व डेटा हवा असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

याचिकाकर्त्यांचे वकील लुथ्रा यांनी न्यायालयाला सांगितले की, जीएसटी कायद्याच्या कलम ६९अंतर्गत करदात्याने देय आणि थकित असलेल्या रकमेचा निवाडा केला जाण्यापूर्वीच त्यांना अटक करण्याचा निर्णय घेतला जातो. कराचे मूल्यांकन करून रक्कम निश्चित केल्याशिवायच कलम ६९अंतर्गत करदात्याच्या स्वातंत्र्याचा संकोच केला जाऊ शकतो का हा प्रश्न विचारात घ्यायला हवा, असे ते म्हणाले.

ताडोबा प्रकल्पातील १२ कोटींच्या घोटाळ्याचा ईडीकडून तपास सुरु

■ **चंद्रपूर, सचिन कदम:**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील १२ कोटी १५ लाख ५० हजार रुपयांच्या ऑनलाईन तिकीट घोटाळ्याची चौकशी अंमलबजावणी संचालनालय (ईडी) या केंद्रीय तपास यंत्रणेने सुरू केल्याने वन विभागात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या घोटाळ्यातील मुख्य आरोपी अभिषेक विनोदसिंह ठाकूर व रोहित विनोदसिंह ठाकूर या दोघांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली होती. आता ईडीने तपास सुरू केल्याने ठाकूर बंधूंच्या अडचणीत वाढ झाली आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील ऑनलाईन तिकीटचे काम चंद्रपूर वाईल्ड लाईफ कनेक्टीविटी सोल्युशन या अभिषेक विनोदसिंह ठाकूर व रोहित विनोदसिंह ठाकूर यांच्याकडे होते. या दोघांनी मिळून ऑनलाईन तिकीट विक्रीत १२ कोटी १५ लाख ५० हजारांचा गैरव्यवहार केला. या आर्थिक गुन्ह्याच्या प्रकरणात ठाकूर बंधूंना अटक झाली. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांना या आर्थिक गुन्ह्याची पाळेमुळे अधिक खोलवर असल्याची शंका आली. त्यामुळे डॉ. रामगावकर यांनी ईडीकडे या गुन्ह्याचा तपास करण्याची विनंती केली. डॉ. रामगावकर यांच्या विनंतीनंतर ईडीने तपास सुरू केला आहे. या प्रकरणी ईडीच्या अधिकाऱ्यांनी ताडोबा व्यवस्थापनाकडून लेखा परीक्षणाची सर्व कागदपत्रे मागवून घेतली आहेत. गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी संतोष म्हस्के यांच्याकडूनही प्रकरणाची सर्व कागदपत्रे मागविली आहेत. या प्रकरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण झाली आहे. त्यामुळेच ईडीने सविस्तर तपास सुरू केला आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी ताडोबाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, तपास करण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाला विनंती केली होती. त्यानुसार तपास सुरू झाला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील मुख्य आरोपी अभिषेक व रोहित ठाकूर बंधू जवळपास एक ते दीड महिना फरार होते. स्थानिक न्यायालयाने ठाकूर बंधूंना काही रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले होते. त्यांनी काही रक्कम जमाही केली होती. मात्र या घोटाळ्याची पाळेमुळे अधिक खोलवर रुजल्याने उच्च न्यायालयाने या दोघांचा जामीन रद्द केला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही जामीन रद्द केला. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या नेतृत्वात अभिषेक व रोहित ठाकूर यांना एप्रिल महिन्यात अटक करण्यात आली. त्यानंतर या दोघांना जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता १२ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली होती. त्यानंतर ठाकूर बंधूंची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली होती. आता या घोटाळ्याचा तपास अंमलबजावणी संचालनालयाने सुरू केल्याने अभिषेक व रोहित ठाकूर यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे.

कोरोनाकाळात प्रतिजैविकांचा अतिवापरामुळे आता उपचारांमध्ये प्रतिजैविक औषधांची मात्रा लागू पडत नाही : जागतिक आरोग्य संघटना

■ **पुणे, अभिजित येरल्लू:**

कोरोनाकाळात प्रतिजैविकांचा (अँटिबायोटिक्स) अतिप्रमाणात वापर झाल्याने आता उपचारांमध्ये प्रतिजैविक औषधांची मात्रा लागू पडत नसल्याची समस्या समोर येत आहे. करोनाच्या आठ टक्के रुग्णांना प्रतिजैविकांची गरज असताना प्रत्यक्षात ७५ टक्के रुग्णांना प्रतिजैविक औषधे देण्यात आल्याचा निष्कर्ष जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात मांडण्यात आला आहे. प्रतिजैविकांच्या वापरामुळे करोनारुग्णांच्या प्रकृतीत फार सुधारणा झाल्याचेही दिसून आलेले नाही. त्यामुळे प्रतिजैविकांच्या अतिवापराने होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी पावले उचलणे आवश्यक असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेचे म्हटले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ६५ देशांतील रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या चार लाख ५० हजार करोनारुग्णांच्या वैद्यकीय अहवालाची तपासणी केली. ही तपासणी जानेवारी २०२० ते मार्च २०२३ या कालावधीत करण्यात आली. गंभीर लक्षणे असलेल्या रुग्णांमध्ये प्रतिजैविकांचा सर्वाधिक वापर करण्यात आला. जगभरात करोनामुळे गंभीर झालेल्या जवळपास ८१ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. मध्यम आणि सौम्य लक्षणे असलेल्या करोनारुग्णांना प्रतिजैविके देण्याचे प्रमाण प्रत्येक देशांमध्ये वेगवेगळे दिसून आले आहे. प्रतिजैविके देण्यात आल्याने करोनारुग्णांच्या प्रकृतीत फरक पडला नाही. जीवाणू संसर्ग नसलेल्या रुग्णांमध्ये या औषधांमुळे दुष्परिणाम दिसून आल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने नमूद केले आहे. जीवाणू आणि बुरशी संसर्ग झाल्यानंतर प्रतिजैविकांचा वापर केला जातो. प्रतिजैविकांचा अतिप्रमाणात वापर झाल्यास त्या व्यक्तीचे शरीर या औषधांना दाद देत नाही. परिणामी रुग्णांना उपचार देताना गुंतागुंत निर्माण होते. त्यामुळे प्रतिजैविकांचा अतिप्रमाणात होणारा वापर थांबविणे आवश्यक असल्याचे मत वैद्यतीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

अहवालातील महत्त्वाचे मुद्दे :

- कोरोनाकाळात गरज नसतानाही प्रतिजैविकांचा वापर
- अतिवापरामुळे औषधांना दाद न देण्याची समस्या वाढली
- जगभरात चारपैकी तीन रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली
- प्रतिजैविके देऊनही करोनारुग्णांना फायदा नाही.
- आरोग्याच्या विविध समस्या निर्माण झाल्या

आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत भविष्य निर्वाह निधीचा अपहार... बनावट कागदपत्रांद्वारे नऊ कोटी रुपयांची फसवणूक

■ **पुणे, विशाल पाटील:**

बनावट कागदपत्रांद्वारे ८९ कंपन्यांची स्थापना करून आत्मनिर्भर भारत योजनेतील कामगारांच्या नावे केंद्र शासनाकडून जमा करण्यात आलेला नऊ कोटी ५६ लाख रुपयांच्या भविष्य निर्वाह निधीचा अपहार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ८९ कंपन्यांची स्थापना करण्यासाठी निरनिराळी नावे, पत्ते आणि एकच मोबाइल क्रमांक दिल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली असून, पोलिसांकडून या प्रकरणाचा तांत्रिक तपास सुरू करण्यात आला आहे. भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील अधिकारी मनोजकुमार असरानी (वय ४५) यांनी या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत रोजगार योजनेचा लाभ घेण्यासाठी कंपन्यांची तपशीलवार माहिती, कामगारांची संख्या आणि त्यांच्या नावांची तपशीलवार नोंद करावी लागते. त्यानंतर कंपनी आणि सरकारकडून दरमहा ठराविक रक्कम कामगारांच्या नावाने जमा केली जाते. गेले चार वर्षे एकाच व्यक्तीने बनावट कागदपत्रांच्याआधारे ८९ कंपन्यांची नोंद केली असल्याचा प्रकार भविष्य निर्वाह कार्यालयातील अधिकारी राहुल कोकाटे यांच्या निदर्शनास आला. कंपनी आणि कामगारांची नावे असलेली बनावट कागदपत्रे भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. अशा पद्धतीने फसवणुकीचे आणखी काही प्रकार घडल्याचा संशय आहे. भविष्य निर्वाग निधी कार्यालयाकडून याप्रकरणी अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली आहे. वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे यांच्या मार्गदशार्खाली सहायक पोलीस निरीक्षक दत्तप्रसाद शेंडगे तपास करत आहेत.

विद्यार्थ्यांच्या तक्रारींवर मार्ग काढण्यासाठी मुंबई विद्यापीठाचा 'विद्यार्थी संवाद' उपक्रम ठरतोय प्रभावी माध्यम

■ **मुंबई, विशाल कारंडे:**

परीक्षेचा वेळा, निकालास लागणार उशीर, त्यामुळे पुढ्यच्या प्रवेशावर होणारा परिणाम अशा अनेक अडचणींना मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी सामोरे जात असतात. दरम्यान मुंबई विद्यापीठाने यासंदर्भात महत्वाचे पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक बाबींशी निगडीत प्रश्न, शंका, समस्या यांचे निरसन करण्यासाठी विद्यार्थी संवाद हा उपक्रम सुरु केला. मुंबई विद्यापीठाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रभावी माध्यम ठरत आहे.

निकाल, राखीव निकाल, पुनर्मूल्यांकन, छायांकीत प्रत आणि गुणपत्रिका अशा अनुषंगिक तक्रारींचे निवारण जलदगतीने आणि तात्काळ होत आहे. शनिवारी आयोजित केलेल्या तिसऱ्या विद्यार्थी संवाद उपक्रमाच्या माध्यमातून एकूण 14 तक्रारींचे निवारण करण्यात आले. यामध्ये राखीव निकाल, पुनर्मूल्यांकनाचे निकाल, तात्पुरते पदवी प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका अशा अनुषंगिक विषयांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आयोजित आजच्या विद्यार्थी संवाद कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील छत्रपती शिवाजी महाराज भवन (नवीन परीक्षा भवन) येथे शनिवारी या कार्यक्रमाचे करण्यात आले होते.

सौरऊर्जेद्वारे वीज निर्मितीत नागपूर आघाडीवर, राज्याच्या उत्पादनात नागपूर परिमंडळाचा मोठा वाटा

■ **नागपूर, नितीन देवळेकर :**

घराच्या छपरावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून निर्माण झालेली वीज स्वतः वापरायची आणि जास्त निर्मिती झाली तर महावितरणला द्यायची या 'रुफ टॉप सोलर' योजनेत नागपूरकर वीजग्राहकांनी आघाडी घेतली आहे. राज्यभरात महावितरणच्या १ लाख ४० हजार ८०८ ग्राहकांकडून सोलर रुफ टॉप लावण्यात आले असून यामध्ये नागपूर जिल्ह्यातील २४ हजार ३५७, तर वर्धा जिल्ह्यातील २ हजार ६५३ वीजग्राहकांचा समावेश आहे. सध्याच्या घडीला राज्यभरात रुफ टॉप सोलरदद्वारे २ हजार ५३ मेगावॉट इतक्या क्षमतेने वीजनिर्मिती करण्यात येत आहे. यामध्ये नागपुरातून २५१ मेगावॉटची निर्मिती होत आहे. राज्यातील एकूण सोलर रुफ टॉपच्या तुलनेत १७.२९ टक्के सोलर रुफ टॉप एकट्या नागपूर जिल्ह्यात आहेत. तर नागपूर परिमंडळाचा विचार केल्यास वर्धा जिल्ह्यातील २ हजार ६५३ आणि नागपुरातील २४ हजार ३५७ अशा एकूण २७ हजार १० ग्राहकांनी त्यांच्या घराच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती सुरू केली आहे. राज्याच्या एकूण उत्पादनात नागपूर परिमंडळाचा वाटा १९.१८ टक्के इतका आहे. सात वर्षांपूर्वी राज्यामध्ये केवळ १ हजार ७४ ग्राहकांकडून २० मेगावॉट सौरऊर्जा रुफ टॉप पद्धतीने निर्माण होत होती. गेल्या सात वर्षांत त्यामध्ये मोठी वाढ झाली असून एकूण ग्राहकांची संख्या १ लाख ४० हजार ८०८ इतकी झाली आहे. गेल्यावर्षी ही संख्या ७६ हजार ८०८ इतकी होती. यातून सौरऊर्जा निर्मितीची क्षमता एक हजार ८६० मेगावॉट होती. नागपूर जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात तब्बल १० हजार ९४ ग्राहकांनी ८२ मेगावॅट रुफ टॉप संचांची स्थापना केली आहे. सौरऊजेर्तून निर्माण होणाऱ्या विजेमुळे ग्राहकाचा नेहमीपेक्षा कमी वीज वापर होतो, त्यामुळे वीजबिलात देखील कपात होते. याशिवाय ग्राहकाच्या सौर पॅनेलमधून त्याच्या वापरापेक्षा जास्त वीज निर्माण झाली, तर ती महावितरणच्या ग्रीडमध्ये पाठवली जाते व कंपनी त्या विजेच्या मोबदल्यात वीजबिलात सवलत देते. यातून कधी कधी ग्राहकांना शून्य रकमेचे वीज बिलही येते. सोलर पॅनेल बसविण्याचा खर्च चार ते पाच वर्षांत भरून निघतो पण त्यांचा उपयोग पंचवीस वर्षे होत असतो असा दावा कंपनीकडून करण्यात आला आहे.

कल्याण क्राईम ब्रँचने किराणा दुकानात टाकलेल्या छाप्यात ३ किलो अमली पदार्थ केले जप्त

■ **अंबरनाथ, रोहित जैसवाल :**

कल्याण क्राईम ब्रँचने अंबरनाथ तालुक्यातील नेवाळी गावातील किराणा दुकानात छापा टाकत सुमारे साडे चार कोटी रुपये किमतीचे तीन किलो अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी उल्हासनगर हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून राजेश कुमार प्रेमचंद तिवारीला बेड्या ठोकल्या आहेत. तर शैलेंद्र अहिरवार हा फरार झाला असून पोलीस त्याच्या मागावर आहेत. हे दोघे ड्रग्स कुणाला विकत होते? कुठून आणत होते? यामध्ये आणखी किती जण सहभागी आहेत? याचा शोध आता कल्याण क्राईम ब्रँच घेत आहे . दरम्यान केला काही महिन्यांपासून कल्याण डोंबिवलीसह आजूबाजूच्या परिसरात अमली पदार्थांची विक्री होत असल्याचे अनेकदा आढळून आल्याने हा चिंतेचा विषय ठरला आहे .

अंबरनाथ तालुक्यातील नेवाळी येथील गायत्री किराणा दुकानांमध्ये अमली पदार्थ बेकायदेशीररित्या विक्री करत असल्याची माहिती कल्याण क्राईम ब्रँचच्या पथकाला माहिती मिळाली . माहिती मिळताच कल्याण क्राईम ब्रँचच्या पथकाने या किराणा दुकानात छापा टाकला. या कारवाईत दरम्यान दुकानात तीन किलो अमली पदार्थ आढळून आले.

या ड्रग्सची किंमत सुमारे ४ कोटी ५२ लाख २९ हजार रुपये आहे.या प्रकरणी कल्याण क्राईम पोलिसांनी राजेश कुमार तिवारी याला बेड्या ठोकल्या आहेत तर त्याचा साथीदार शैलेंद्र अहिरवार हा फरार झाला असून पोलिस याचा शोध घेत आहेत.

राजेश कुमार तिवारी याचे नेवाळी परिसरात गायत्री किराणा मालाचे दुकान आहे . या दुकानातून तो अमली पदार्थांची विक्री करत होता. हे ड्रग्स कुणाला विक्री केले जात होते व कुठून आणले जात होते, या दोघांव्यतिरिक्त आणखी कोण त्यांच्या टोळीत आहे का ? याचा तपास कल्याण क्राईम ब्रँच पोलीस करत आहेत. दरम्यान एका किराणा मालाच्या दुकानात इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ सापडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मुंबईसह कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा 'या' भागात पाऊस पडण्याची शक्यता

■ **रत्नागिरी, दिगंबर जाधव :**

एप्रिल महिन्यापासून राज्यातील नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागतोय. मुंबईतही परिस्थिती अशीच काहीशी दिसून येतेय. भारतीय हवामान विभागाने (IMD) वर्तवलेल्या अंदाजानुसार, मुंबई, ठाणेसह कोकणात उष्णतेच्या लाटेचा त्रास सहन करावा लागू शकतो. याशिवाय येत्या काही दिवसांत राज्यातील काही भागात तापमानात मोठी वाढ होणार असून काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ५ आणि ६ मे दरम्यान हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. रायगडसह रत्नागिरी, सांगली, सोलापूरमध्ये ५ मे रोजी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. उष्णतेच्या लाटे सोबतच मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, मुंबईतील चेंबूर तसंच पवई भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. या ठिकाणी तापमान ३७ डिग्री सेल्सियस पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. मुंबईच्या अनेक भागांमध्ये पुढील चार ते पाच दिवसांत स्थानिक कमाल तापमानात २-३ अंश सेल्सिअसने घसरण होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आयएमडीने आज कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याला उष्णतेचा यलो अलर्ट दिला आहे.

भाईंदरमध्ये लव्ह-जिहादची धमकी देत 30 लाखांची खंडणी मागणाऱ्या महिलेला नवघर पोलिसांनी केली अटक

■ **विरार, भावना जैन:**

लव्ह जिहाद आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करेन अशी धमकी देत आपल्या लिव्ह इन पार्टनरकडे ३० लाखांची खंडणी मागणाया महिलेला नवघर पोलिसांनी अटक केली आहे. नवघर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सय्यद अन्वर इसामुद्दीन हुसेन (३६) असे फियार्दीचे नाव असून तो मीरा रोड येथील नया नगर येथील रहिवासी आहे. त्याने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार संध्या अदाटे (३३) या तरुणीसोबत तो डिसेंबर २०२३ पासून भाईंदर येथे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये एकत्र रहात होता. जानेवारीपासून संध्याने क्षुल्लक कारणावरून त्याच्याशी भांडण सुरू केले होते. त्यानंतर काही दिवसांतच तिने पैशाची मागणी करत त्रास देण्यास सुरुवात केली होती. लव्ह जिहाद, बलात्कार आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत दिने ३० लाखांची खंडणी मागितल्याची तक्रार हुसेन याने केली आहे. हुसेन याचा मित्र नीलेश सोनी आणि इतरांवर सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी तिने दिल्याचा आरोपही हुसैन यांनी केला आहे. या प्रकरणी नवघर पोलिसांनी संध्या अदाटे विरोधात खंडणी, फसवणूक आदी विविध कमलांअतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे. आरोपी संध्या अदाटे हिचे यापूर्वीच लग्न झाले असून तिच्या पतीविरोधात कौटुंबिक न्यायालयात दावा प्रलंबित आहे. तसेच सदर प्रकरणातील अधिकचा तपास नवघर पोलीस करीत आहेत.

गुजराती समोसा

साहित्य सारणासाठी : एक कप भिजवलेले पोहे, मिक्स भाज्या, बटाटा, गाजर, बीन्स, फ्लॉवर, सिमला मिरची, एक टेबलस्पून तीळ, हिंग, मोहरीची फोडणी, धने-जिरेपूड, आलं, हिरवी मिरची वाटून, लिंबाचा रस, साखर, मीठ, तिखट.

कृती : फोडणी बनवा. त्यात आलं, मिरच्या तीळ घाला. वाफवलेल्या भाज्या घाला. पोहे घाला. गार झाल्यावर धने-जिरेपूड, मीठ, साखर, लिंबाचा रस, कोथिंबीर घाला.

कव्हरसाठी : दोन कप मैदा, अर्धा चमचा बेकिंग पावडर, मीठ चवीनुसार, अंदाजाने तूप घालून घट्ट भिजवा. नेहमीप्रमाणे सारण भरून समोसे बनवून तळा. तेलात तळा. खजुराच्या चणीबरोबर द्या. त्यासाठी पाव किलो खजूर, शंभर ग्रॅम चिंच, थोडा गुळ, धने-जिरेपूड, तिखट, मीठ सर्व उकळून गाळून घ्या.

गुलाबपाणी : केसांना सतेज करणारा नैसर्गिक उपाय!

गुलाबाची मोहकता आणि मंद सुगंध नेहमीच आपला मूड तत्काळ रिफ्रेश करायला मदत करतो. पण केवळ बुकेमध्ये किंवा गजरा आणि हारांपुरताच फुलांचा वापर नसतो. गुलाब हे फूल जितके मोहक दिसते तितकेच त्याचे आरोग्यदायी फायदेदेखील आहेत.

सौंदर्य खुलवण्यासाठीदेखील गुलाब फायदेशीर ठरते. त्यामधील मॉइश्चरायझिंग घटक, टोनिंग करण्याची क्षमता त्वचेमधील दाह कमी करून त्वचेला सतेज बनवते. गुलाबाचे आरोग्यदायी गुणधर्म, सौंदर्य खुलवण्याची क्षमता यासोबतीने केसांचीही चमक वाढवण्यासाठी फायदा होतो हे तुम्हाला ठाऊक आहे का? म्हणूनच केसांचे आरोग्य जपण्यासाठी ब्युटी एक्स्पर्ट दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.

गुलाबपाणी कसे ठरते फायदेशीर?

गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून लावल्यास त्वचेला हायड्रेट करतात, पण त्यासोबतच त्वचेला सतेज करण्यास, मॉईश्चराईज्ड करण्यास मदत करतात. मात्र गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून केसांना लावल्यास टाळूवरील अतिरिक्त तेल प्रमाणात राहण्यास मदत होते. सोबतच टाळूवरील pH balance राखण्यास मदत होते. यासोबतच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि ॲण्टीऑक्सिडंट घटक यांचा मुबलक साठा असतो. गुलाबातील इसेन्शियल ऑईल शुष्क त्वचेची समस्या आटोक्यात ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शाम्पूसोबत त्याचा वापर केल्यास टाळूवरील त्वचा मॉईश्चराईज्ड होण्यास मदत होते तसेच हेअर फोलिकल्स मजबूत होतात.

फ्रिझी आणि निस्तेज केसांवर कशाप्रकारे वापराल गुलाब पाणी?

निस्तेज केसांसाठी

केसांवर कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायर वापरत असाल तर केसांचे नुकसान होते. केस अधिक शुष्क होतात. केसांना पुन्हा सतेज करण्यासाठी गुलाबपाणी फायदेशीर ठरते. याकरिता जोजोबा ऑईलमध्ये गुलाबपाणी मिसळा. या मिश्रणाने टाळूवर हलकासा मसाज करा. मसाज केल्यानंतर सुमारे १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ धुवावेत. या उपायाने केसांचे नुकसान आटोक्यात ठेवण्यास मदत होते. कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायरमुळे केस खराब झाल्यास हा उपचार फायदेशीर ठरतो.

फ्रिझी हेअर

फ्रिझी हेअरचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी गुलाबपाण्यासोबत कोरफडीचा गर मिसळा. हे मिश्रण एकत्र करून टाळूवर हलकासा मसाज करा. सुमारे ३० मिनिटांनंतर पाण्याने केस स्वच्छ धुवावेत.

दररोज जेवणात टाका चिमूटभर हिंग, कधी होणार नाही हे ५ आजार

भारतीय जेवणात स्वाद आणि सुगंध वाढवण्यासाठी हिंगाची फोडणी दिली जाते. हिंगाचा सुवास तेज आणि जेवण्याची इच्छा जागृत करणारा असतो. आयुर्वेदात देखील याचे अनेक फायदे सांगितले गेले आहेत. आपण दररोज चिमूटभर हिंग वापराल तर अनेक आजारांपासून मुक्ती मिळू शकेल. हिंग पोट, लिव्हर आणि डोळ्यासाठी फायदेशीर ठरतो. जाणून घ्या रोज हिंगाचे सेवन केल्याने आरोग्यावर काय प्रभाव पडेल.

पोटासंबंधी आजार

हिंग पोटासाठी अत्यंत फायदेशीर आहे. दररोज हिंगाचे सेवन केल्याने पोटासंबंधी समस्या जसे अपचन, गॅस सारख्या समस्या दूर होतात. याने पोटात गॅस, पोटातील किडे, मरोड आणि पोटासंबंधी सर्व वेदनांपासून मुक्ती मिळते.

बीपीची समस्या

हिंगात रक्त पातळ करण्याचे गुण असतात. म्हणून हे ब्लड प्रेशरच्या आजाराने त्रस्त लोकांसाठी फायदेशीर आहे. याने नसांमध्ये बल्ड क्लॉटिंग सारखी समस्या होत नाही ज्याने ब्लड प्रेशर अनियंत्रित होण्यापासून मुक्ती मिळते.

श्वासासंबंधी आजार

खोकल्याची समस्या असल्यास हिंगाचे सेवन फायदेशीर आहे. हिंग सामान्य खोकला, कोरडा खोकला, इंफ्लूएंजा, ब्रोन्काइटिस आणि दमा सारख्या आजारापासून दूर ठेवतं. डाळ, सांभार आणि भाज्यामध्ये हिंग वापरलं जाऊ शकतं. श्वासासंबंधी आजार असल्यास हिंगात जरासं पाणी मिसळून छातीला लावल्याने आराम मिळतो. याव्यतिरिक्त खोकला आणि दमा सारख्या आजारात आपण हिंगात मध मिसळून सेवन करू शकता.

मासिक धर्म

अनेक महिलांना मासिक धर्म दरम्यान वेदना सहन कराव्या लागतात. दररोज हिंगाचे सेवन केल्याने या दरम्यान होणाऱ्या वेदनांपासून मुक्ती मिळते.

हिंग प्रोजेस्ट्रॉन हार्मोन्स उत्पादनात मदत करतं, ज्याने ब्लड फ्लो सुरळीत राहतं. पीरियड्सदरम्यान वेदनापासून मुक्तीसाठी एक ग्लास ताकात २ चिमूट काळं मीठ आणि १ चिमूट हिंग मिसळून प्यावं.

डोकेदुखी

हिंगात शरीरातील आंतरिक सूज कमी करण्याची क्षमता असते. साधारणतः डोक्यातील आर्ट्रिजमध्ये सूज असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागतो. अशात रोज हिंगाचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून मुक्ती मिळू शकते. डोकेदुखीचे प्रमाण अधिक असल्यास एका ग्लासात २ चिमूट हिंग उकळून घ्या. कोमट झाल्यावर दिवसातून दोनदा प्यावे.

जेवण केल्यानंतर लगेच झोपण्याचे दुष्परिणाम

अवेळी, तसेच लगेच झोपे येणे धोकायदायक आहे, अशी झोप टाळली पाहिजे, कारण दुपारी जेवल्यानंतर एक छोटी डुलकी घ्यायची सवय काहींना असते. जेवल्यावर लगेच झोपणे धोकादायक ठरू शकतं. कारण जेवल्यानंतर, नाष्टा केल्यानंतर किंवा काहीही खाल्ल्यानंतर झोपणं हे शरीराच्या आरोग्यासाठी हानीकारक मानलं जातं.

चयापचय म्हणजे पचनास अडथळा : जेवल्यावर तातडीने झोपल्यास पोटात गेलेल्या अन्नाचं योग्य पद्धतीने पचन होत नाही. यामुळे शरीरात एक विशिष्ट प्रकारचं आम्ल तयार होतं आणि ते छातीत जातं. यामुळे अनेक वेळा आंबट ढेकरही येतात. शिवाय अन्नाचं योग्य पद्धतीने पचन न झाल्यास अनेक आजार जडू शकतात.

वजन वाढण्याचे दुष्परिणाम : जर तुम्ही जेवल्यानंतर लगेच झोपलात तर, कॅलरीज योग्य पद्धतीने बर्न होत नाहीत. त्यामुळे वजन वाढण्यास मदत होते. आपणं जेवढं खातो त्यापेक्षा जास्त शरीरातील कॅलरीज बर्न करणं गरजेचं असतं. यामुळे शरीराचं कार्य उत्तम राहण्यास मदत होतं.

ॲसिडीटीचा त्रास वाढतो : ॲसिडीटीमुळे शरीराला फार त्रास होतो, शिवाय झोपही लागत नाही. तातडीने झोपल्याने पोटात आम्ल तयार होतं. यामुळे ॲसिडीटी होण्याची दाट शक्यता असते.

हृदयासंबंधीचे आजार बळावतात : जेवल्या जेवल्या झोपल्याने पचनक्रिया बिघडते. याचा परिणाम रक्तदाब आणि रक्तातील साखरेचं प्रमाण वाढतं. यामुळे हृदयावर परिणाम होऊन त्यासंबंधीचे आजार बळावू शकतात. त्यामुळे जेवल्यावर तातडीने झोप घेणे धोकेदायक आहे.

चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

आजच्या जाहिरातीच्या युगात सारेच टुथपेस्ट ब्रॅण्ड चमकदार दातांचा दावा करतात. डेण्टिस्टकडे चमकदार दातांसाठी अनेक ट्रीटमेंट उपलब्ध असतात. पण अनेक घरगुती उपायांनीही तुम्ही तुमचे दात चमकदार बनवू शकता.

नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.

दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.

ॲपल सिडार व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

१९९६ मध्ये मायकल जॅक्सन भारतात आला तेव्हा... राज ठाकरेंनी सांगितला २८ वर्षांपूर्वीचा किस्सा

राज ठाकरे १९९६ मध्ये शिवसेनेच्या उद्योग सेनेचे अध्यक्ष होते. त्यांच्या पुढाकाराने मुंबईत जगप्रसिद्ध दिवंगत डान्सर मायकल जॅक्सनच्या एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. राज ठाकरेंच्या नेतृत्त्वात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. तेव्हाच्या काळात झालेला हा भव्य कार्यक्रम सर्वत्र चर्चेचा विषय ठरला होता. नुकत्याच दिलेल्या 'बोलभिडू'च्या मुलाखतीत राज ठाकरेंनी याबाबत भाष्य केलं आहे. १९९६ च्या काळात मायकल जॅक्सनला भारतात आणून एवढा मोठा कार्यक्रम करायचा हा विचार कुठून आला? याबाबत सांगताना राज ठाकरे म्हणाले, ''मायकल जॅक्सनचा मी

खूप मोठा फॅन आजही आहे. तो माणूस आज नसला तरीही मी त्याचा खूप मोठा, जबरदस्त चाहता आहे. मला असं नेहमी वाटायचं की, या माणसाला भारतात आणलं पाहिजे. हे सगळे विचार डोक्यात सुरू असतानाच एके दिवशी मला असं समजलं की, मायकल जॅक्सन सुद्धा भारतात यायला तयार आहे.'' राज ठाकरे पुढे म्हणाले, ''मग काही नामांकित कंपनीची लोक आली. त्यांनी भरत शाहांना सांगितलं आणि सगळ्या गोष्टी जुळून आल्या आणि तो भारतात आला. याचप्रमाणे मी लता दीदींचे पण शो केले. त्यांनी त्यांचे शेवटचे शो माझ्याकडेच केले. त्यावेळी भूजला भूकंप झाला आणि दीदींचा मला लंडनवरून फोन आला.'' ''फोनवर त्या म्हणाल्या 'राज खरंच खूप भयानक झालंय' त्यावेळी मी घराच्या गॅलरीत फिरत होतो आणि आता सगळ्यांनाच माहितीये माज्या घरासमोर शिवाजी पार्क मैदान आहे. त्या मला म्हणाल्या आपण एक शो करूया आणि त्यातून जो काही निधी उभा राहिल तो आपण भूजला देऊया. त्यांनी विचारलं कुठे करुया...मी फेऱ्या मारत असताना त्यांना सांगितलं...शिवाजी पार्कमध्ये करुया. त्यावेळी त्या शोसाठी मैदानात आम्ही १ लाख १० हजार खुर्च्या लावल्या होत्या. पहिल्यापासून माझ्या मनात जो विचार येतो तोच खूप मोठा असतो. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये मी कधी अडकत नाही'' असं राज ठाकरेंनी सांगितलं. दरम्यान, मायकल जॅक्सनचं मुंबई विमानतळावर स्वागत करण्यासाठी स्वतः राज ठाकरे उपस्थित होते. खास मराठमोळ्या पद्धतीने त्याचं स्वागत करण्यात आलं होतं. याची अनेक दृश्य आजही युट्यूबवर उपलब्ध आहेत. यानंतर मायकल जॅक्सनने बाळासाहेब ठाकरेंची राहत्या घरी भेट घेतली होती.

दै. लोकरक्षणाय सुडोकू - ७४

4	8		9					7
	9	5	7			8	2	
		7		2	3	4		
5		8		3		9		
9	6				2	3		4
		4	6	7				1
7						6		
	2	3	1		6		5	
				9				

उत्तर सुडोकू -७३

8	7	2	5	9	3	6	1	4
3	5	4	6	8	1	7	9	2
1	6	9	2	7	4	3	5	8
7	4	5	9	2	6	1	8	3
9	8	3	7	1	5	2	4	6
6	2	1	3	4	8	9	7	5
2	3	8	1	5	7	4	6	9
4	9	7	8	6	2	5	3	1
5	1	6	4	3	9	8	2	7

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

'स्वातंत्र्यवीर सावरकर' सिनेमावर टीका करणाऱ्यांना रणदीपचं सडेतोड उत्तर

'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटानं बरीच चर्चा घडवली. निर्मितीसाठी त्यानं केलेली कसरत, अचानक हाती आलेली दिग्दर्शनाची धुरा यासह रणदीपला कौतुक आणि टीका या दोन्ही गोष्टींना सामोरं जावं लागलं. त्याविषयी तो म्हणाला, 'मी ज्या हेतूनं चित्रपट केला तो सार्थकी लागला. मी त्यासाठी केलेल्या गुंतवणुकीचा परतावाही प्रेक्षकांच्या प्रेमातून मिळाला. चित्रपटातल्या प्रसंगांदरम्यान आणि संपल्यावर प्रेक्षक उठून टाळ्या वाजवत होते. अनेक चित्रपटगृहांत मी हे दृश्य पाहिलं. असं होईल, असा विचार मी कधीच केला नव्हता. व्यावसायिकदृष्ट्या या कलाकृतीनं केलेली कामगिरी ही प्रेक्षकांचं प्रेम दाखवणारी आहे. अभिनेता-लेखक-दिग्दर्शक म्हणूनही माझं कौतुक झालं. हे खायचं काम नाही, हे कळलं.' प्रत्येक भूमिका कलाकाराला काही देते. या भूमिकेकडून काय मिळालं, असं विचारताच रणदीप म्हणाला, 'एखाद्याला त्याच्या कामाचं श्रेय मिळायला हवं. आजवर अभिनेता म्हणून माझ्या कामाची फारशी दखल घेतली नाही. मी जेव्हा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील कलाकृती करायचं ठरवलं, तेव्हा जाणीव झाली की, राष्ट्रहित हेच सर्वोच्च कर्तव्य मानणाऱ्या या व्यक्तित्त्वाच्या कार्याचीही तशी दखल घेतली गेलेली नाही आणि माज्यासाठी या भूमिकेला जोडणारा हा सर्वात महत्त्वाचा दुवा ठरला. या भूमिकेनं राष्ट्रहित सर्वोच्च असल्याची शिकवणी देताना संघर्षाला सामोरं जाण्याची ताकद दिली. मानसिक धैर्य आणि खंबीर असणं याचं महत्त्व या भूमिकेनं पटवून दिलं'. 'सरबजीत' या चित्रपटासाठी रणदीपनं २० किलो, तर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भूमिका साकारण्यासाठी ३२ किलो वजन घटवलं. त्याच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यताही वर्तवण्यात आली होती. भूमिकांसाठीच्या या 'ट्रान्सफॉर्मेशन'बाबत रणदीप म्हणाला, 'आधी मी हे केलेलं असल्यानं मला त्याचा सराव होता. चित्रपट करताना सगळ्यांच्या मागं इतका धावत होतो की, वजन कमी करण्यासाठी त्याचा फायदाच झाला. मात्र, अचानक आहार कमी झाल्यावर तुमच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम होतो. या अर्थानं ही मानसिक कस पाहणारी भूमिका होती. या सगळ्या प्रक्रियेत माझ्या टीमनं मला अक्षरशः सहन केलं. त्यांच्या सहकार्याशिवाय हे शक्य नव्हतं.'

दिनविशेष

५ मे

- १२६०: कुबलाई खान हा मंगोलियाचा सम्राट बनला.
- १९०१: पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली.
- १९३६: इटालियन सैन्याने इथिओपियातील आदिसअबाबा शहराचा ताबा घेतला.
- १९५५: पश्चिम जर्मनीला सार्वभौमत्व प्राप्त झाले.
- १९६४: युरोप परिषदेने ५ मे हा युरोप दिन घोषित केला.
- १९९७: जयदीप आमरे या साडेपाचवर्षीय बालकाने गोव्यातील मांडवी नदी पोहून पार केली. एवढ्या छोट्या बालकाने ही नदी पोहून पार करण्याची ही पहिलीच घटना आहे.
- १९९९: दक्षिण पाकिस्तानातील हडप्पा येथे केलेल्या उत्खननात पुरातत्त्ववेत्त्यांना सर्वात प्राचीन लिपीचे अवशेष मिळाले.
- ७६७: ८६७ ई .पुर्व : जपानी सम्राट उडा यांचा जन्म. (मृत्यू: १९ जुलै ९३१)
- १४७९: शिखांचे तिसरे गुरू गुरू अमर दास यांचा जन्म. (मृत्यू: १ सप्टेंबर १५७४)
- १८१८: कार्ल मार्क्स साम्यवादी विश्वक्रांतीचा पुरस्कर्ते यांचा जन्म. (मृत्यू: १४ मार्च १८८३)
- १८६४: निले ब्लाय उर्फ एलिझाबेथ जेन कोचरन शोध्यात्राकारितेच्या जनक यांचा पीट्सबर्ग येथे जन्म.
- १९११: भारतीय शिक्षक व कार्यकर्ते प्रितलाता वडेदार यांचा जन्म. (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३२)
- १९१६: ग्यानी झेलसिंग भारताचे माजी राष्ट्रपती यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९४)
- १९८९: लक्ष्मी राय तमिळ अभिनेत्री यांचा जन्म.
- १८२१: फ्रान्सचा सम्राट, असामान्य सेनापती आणि कर्तबगार प्रशासक नेपोलियन बोनापार्ट यांचे निधन. (जन्मः १५ ऑगस्ट १७६९)
- १९१८: त्र्यंबक बापूजी ठोमरे उर्फ बालकवी तथा निसर्गकवी यांचे निधन. (जन्मः १२ ऑगस्ट १८९०)
- १९४३: गायक नट, गायनगुरु रामकृष्णबुवा वझे यांचे निधन. (जन्मः २८ नोव्हेंबर १८७२)
- १९४५: पं. रामकृष्णबुवा वझे गायनाचार्य यांचा पुणे येथे निधन.
- १९८९: उद्योगपती, पद्मभूषण नवल होर्मुसजी टाटा यांचे निधन. (जन्मः ३० ऑगस्ट १९०४ झ मुंबई)
- २००६: नौशाद अली ज्येष्ठ संगीत दिगदर्शक यांचा मुंबई येथे निधन.
- २००७: लेसर चे निमार्ते थिओडोर हेरॉल्ड मॅमन यांचे निधन. (जन्मः ११ जुलै १९२७)
- २००८: बास्किन-रॉबिन्स चे सहसंस्थापक इरब रोबिन्स यांचे निधन. (जन्मः ६ डिसेंबर १९१७)
- २०१२: भारतीय क्रिकेटपटू सुरेंद्रनाथ यांचे निधन. (जन्मः ४ जानेवारी १९३७)

भविष्य

मेष दूरच्या प्रवासाचा योग येईल. जास्त धाडस करू नका. व्यावसायिक प्रगतीचे दर उघडेल. सर्वांशी गोडीगुलाबीने वागाल.

वृषभ व्यावसायिक बदलाचे वारे मनात वाहू लागतील. कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. मुलांकडून चांगल्या बातम्या मिळतील.

मिथुन मनातील आकांक्षा विनासायास पूर्ण होतील. तरुण वर्गाने कसलीही घाई करू नये. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी.

कर्क महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यावी. वरिष्ठांना नाराज करू नका. धार्मिक कायार्चा लाभ घ्यावा. भावंडांची काळजी लागून राहील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

सिंह तुमचा मनमोकळा स्वभाव इतरांच्या नजरेत भरेल. वरिष्ठांच्या शाबासकीस पात्र व्हावे. प्रेमप्रकरणातील जवळीक त्रासदायक ठरू शकते. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे.

कन्या मुलांचा व्रात्यपणा वाढू शकतो. कामात चिकाटी ठेवावी लागेल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल. जुन्या कामातून लाभ संभवतो. अति अपेक्षा बाळगू नका.

तुला हाती सोपवलेले काम वेळेत तडीस न्याल. कामात कसलीही घाई उपयोगाची नाही. डोके ठिकाणावर ठेवून वागावे. कौटुंबिक बाजू ध्यानात घेऊन वागावे. घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

वृश्चिक जोडीदाराशी अनबन टाळावी. स्वकष्टाने आर्थिक बाजू सुधारेल. आपल्या वागण्याने कोणी दुखवणार नाही याची काळजी घ्यावी. सत्य-असत्याची खातरजमा करावी.

धनु बाह्यरुपावर भुलू नका. काटकसरीचा मार्ग अवलंबाल. नवीन आव्हानाला सामोरे जाल. तुमची काम करण्याची शक्ति वाढेल. तुमचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

मकर सर्वांशी मधुर वाणीने बोलाल. कौटुंबिक जबाबदारी वाढू शकते. तुमच्या संभाषणाची उत्तम छाप पडेल. कामात अधिक उत्साह येईल. तुमची महत्त्वाकांक्षा वाढीस लागेल.

कुंभ व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. काही गोष्टींचे धोरण ठरवावे लागेल. सामाजिक गोष्टींची जाणीव ठेवावी. गुरूजनांचा आशीर्वाद लाभेल. तुमची मानमान्यता वाढेल. फसवणुकीपासून सावध राहावे.

मीन नैराश्याला बळी पडू नका. फसवणुकीपासून सावध राहावे. मैत्रीचे नाते जपावे. जमिनीच्या कामास गतीमानता येईल. अति श्रमाचा थकवा जाणवेल. जवळचा प्रवास घडेल. जोडीदाराविषयी मतभेद संभवतात.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

पायाभूताचा पाया पोकळ

मुंबईच्या समस्या कमी करण्यासाठी झोकात होणाऱ्या वल्गनांमधून सौदागरांची धन होते, पण सामान्यांचे जिणे मात्र होते तसेच राहते. या प्रश्नाची पुनरुक्ती झाल्यासारखे वाटेल. पण त्यास इलाज नाही. या पुनरुक्तीमागील ताजे कारण म्हणजे अवघ्या काही दिवसांत मुंबईत झालेले तीन मृत्यू. जवळपास दीड कोट मानवी जीव अंगावर वागवणाऱ्या या महानगरास मृत्यूचे वावडे नाही. या शहरात माणसे किडा-मुंगीसारखी मरतात आणि तरीही जणू काही घडलेच नाही, अशा तऱ्हेने इतर जगत राहतात. प्रसन्न चित्ताने प्रभातफेरीस निघालेली एखादी महिला डोक्यावर नारळ पडून मरते तर भर पावसातही आपल्या कर्तव्यपालनार्थ निघालेला एखादा वैद्यक चक्क गटारात पडून मरतो. अलीकडे तर आकाशातील विमानही इमारतीवर आदळून काही जणांचे प्राण गेल्याचे या मुंबईने अनुभवले. दुर्गंधी टाळण्यास नाकाला रुमाल लावणाऱ्यांना स्वच्छ जगता यावे म्हणून त्यांची गटारे साफ करणारे कसे गुदमरून मरतात तेही हे शहर शांतपणे अनुभवते. तेव्हा या शहरास दुर्दैवाने मरणाचे काडीचेही सोयरसुतक नाही. अशी अनेक अश्रापांची मरणे हे शहर अंगावर वागवते आणि जगत राहते. या शहराची संवेदना बोथटतेच्या पलीकडे गेलेली असली तरीही काही मृत्यू अस्वस्थ करतात. अशा अस्वस्थ करणाऱ्या मृत्यूंची संख्या यंदाच्या पहिल्या चार महिन्यांतच ५६५ वर गेली असून यातही यातील १३९ मृत्यू या अस्वस्थतेस अधिक वेदनादायी बनवतात. हे सर्व मृत्यू जिचे वर्णन मुंबईची जीवनरेखा, लाइफलाइन इत्यादी गुणवैशिष्ट्यांसह केले जाते त्या लोकलच्या प्रवासात घडले. पोटासाठी या महानगरीतील सामान्यांस ज्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा आधार घ्यावा लागतो तीच वाहतूक यंत्रणा जीवघेणी ठरू लागली आहे. म्हणून पुनरुक्ती होत असली तरी एक प्रश्न विचारावाच लागेल. तो म्हणजे, आपले प्राधान्यक्रम नक्की कोणते? या प्रश्नाचे उत्तर ज्यांना आयुष्यात मिळालेले असते वा ज्यांना हा प्रश्न पडत नाही त्यांच्यासाठी वातानुकूलित प्रवासी सेवा असते. ॲप आधारित वाहतूक सेवा असतात. दूरच्या प्रवासासाठी 'वंदे भारत' असते आणि त्याच वेळी या वर्गास 'स्वस्त' वाटणारी विमान सेवाही त्यांच्या दिमतीला असते. पण हा प्रश्न त्या वर्गासाठी नाही. हे सर्व ज्यांना परवडत नाही त्यांच्यासाठी काय, हा यातील महत्त्वाचा प्रश्न. ॲप आधारित वाहतूक सेवा / वंदे भारत/ विमान इत्यादी सेवा वापरणारे सर्वांच्याच कार्यक्रमपत्रिकेवर असतात. अर्थसंकल्प, पायाभूत सोयी इत्यादी सारे याच वर्गासाठी तर असते. यापेक्षा वरच्या वर्गास या सगळ्यांची काहीही गरज नसते आणि त्यांचे कार्य सिद्धीस नेण्यास त्यांचा त्यांचा 'श्री' समर्थ असतो वा ते त्यास 'मॅनेज' करू शकतात. त्यामुळे सामान्यांस भेडसावणाऱ्या चिंता त्यांना सतावत नाहीत. म्हणून खरी समस्या आहे ती कनिष्ठ मध्यमवर्गाची. मुंबईतील या वर्गास लोकल गाडयांखेरीज पर्याय नाही. हे ज्या परिसरात राहतात तेथे बस सेवा नाही आणि खासगी टॅक्सी परवडणारी नाही. नोकरीधंद्यासाठी मुंबईत येण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लोकल गाडया. दररोज जवळपास ७०-७५ लाख मुंबईकर या काडयापेटयांच्या डब्यांतून प्रवास करतात. पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला सरकारला वेळ नाही. म्हणून याच उपनगरी स्थानकात केवळ चेंगराचेंगरीत कित्येक जण गुदमरतात आणि अवघ्या चार महिन्यांत १३९ जण लोकलमधून पडून गतप्राण होतात. गेल्या आठवडाभरात ज्यांनी असा जीव गमावला ते सर्व तरुण आहेत. चांगल्या कारकीर्दीच्या उमेदीने ते मायानगरीकडे धावत होते. पण वाहन व्यवस्थेने त्यांना सामावून घेतले नाही. धावत्या लोकलमधून ते रुळावर पडले आणि गेले. यावर ''भाकरी मिळत नसेल तर केक खा'' असा सल्ला देणाऱ्या मेरी अंत्वानेतचे मराठी भाऊबंद शहाजोगपणे ''यांनी बाहेर लोंबकळून मुळात जावेच का'', असा प्रश्न विचारतील. तथापि असा प्रश्न विचारणाऱ्यांस हे माहीत नसेल की उच्चमध्यमवर्गीयांस सुखावणाऱ्या रेल्वे गाडया अधिकाधिक सामावून घेता याव्यात म्हणून मुंबईतील लोकल गाडयांच्या वेळापत्रकास अधिकाधिक आकसून घ्यावे लागते. हा उन्हाळी सुट्टयांचा काळ. त्यासाठी जादा गाडया सोडणे आलेच. त्यासाठी पुन्हा उपनगरी सेवांचा संकोच. या लोकल गाडयांस वातानुकूलित डबे मध्यमवर्गीयांस सुखावणारे. म्हणून ते वाढवायलाच हवेत. पण लोकलच्या डब्यांची संख्या काही वाढवता येत नाही. मग करा कमी सामान्यांसाठीचे डबे. हाच प्रकार दूर अंतरासाठीच्या गाडयांतही दिसतो. अशा दूर अंतरांवर धावणाऱ्या २२ डब्यांच्या रेल्वेत पूर्वी १२ सर्वसाधारण आणि बिगरवातानुकूलित शयनयान डबे असत आणि वातानुकूलित डब्यांची संख्या आठ असायची. तथापि २०२२ सालच्या जून महिन्यापासून वातानुकूलित डब्यांची संख्या थेट १५ वर नेली. आता बिगरवातानुकूलित- ज्यांस जनरल डबे म्हटले जाते असे- डबे फक्त सहा-सात असतात. या गाडयांच्या 'जनरल' डब्यातही मेंढरापेक्षाही वाईट अवस्थेत माणसे प्रवास करताना दिसतात ते यामुळे. या अशा सामान्यांस आज कोणीही वाली नाही. उपनगरी सेवेबाबत हेच घडताना दिसते. मध्य रेल्वेवरील कल्याण-कसारा आणि कल्याण-कर्जत या दोन मार्गाचा विस्तार रखडलेला आहे आणि नवी मुंबईशी जोडणाऱ्या विशेष मार्गाची तर चर्चाही आता होताना दिसत नाही. शिवाय मुंबईत आणखी एका मार्गिकेची नितांत गरज आहे. त्यासाठी आर्थिक सवड नाही आणि प्राधान्यक्रमात हा प्रकल्प आघाडीवर नाही. या सगळ्यामुळे लोकल गाडयांच्या फेऱ्या, गती आणि वेग वाढवण्यास कमालीच्या मर्यादा येतात. फेऱ्या वाढवायच्या तर लोकल गाडया अधिक हव्यात आणि मार्गावर तितकी मोकळीक हवी. ती नाही. गती वाढवायची तर याच मार्गावरून सरकारसाठी आनंददूत वर्गाच्या वंदे भारत आणि अन्य जलद, दूर पल्ल्याच्या गाडयाही धावणार. त्यांच्यासाठी त्यामुळे लोकल्स स्थानकांत थांबून त्यांना पुढे जाऊ देण्याखेरीज पर्याय नाही. आणि अर्थातच तांत्रिकादी कारणांमुळे वेगही वाढवता येणे अशक्य.

सफाई कर्मचाऱ्यांना कोणी आहे का वाली?

विरारमधील ग्लोबल सिटी येथील खासगी सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राची सफाई करत असताना चार सफाई कर्मचाऱ्यांचा गुदमरून मृत्यू झाल्याची घटना ९ एप्रिलला गुढीपाडव्याच्या दिवशी घडली होती. यात दोन तरुण सख्ख्या भावांचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच १५ एप्रिलला वसई पूर्वेकडील एव्हरशाईन इंडस्ट्रीजची सांडपाण्याची टाकी साफ करताना टाकीत गुदमरून एका सफाई कर्मचाऱ्याला आपले प्राण गमवावे लागले होते.

ग्लोबल सिटीप्रकरणी पोलिसांनी कंपनी मालकासह दोन जणांवर गुन्हा दाखल केला असला तरी या दुर्दैवी घटनेनंतर खासगी कंपन्यांकडून चालवल्या जाणाऱ्या सांडपाणी प्रकल्पाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नव्याने निर्माण होत असलेल्या गृहप्रकल्पात असलेल्या सांडपाणी प्रकल्पांचे ऑडिट करण्याची गरज आहे. इमारती आणि घरांच्या सेफ्टीक टँकची सफाई खासगी कर्मचाऱ्यांकडून केली जाते. महापालिकेने केलेल्या मनाई आदेशाकडेही दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

वसई-विरारमध्ये गुढीपाडवा उत्साहात साजरा केला जात असतानाच रोजीरोटीसाठी विरार पश्चिमेकडील ग्लोबल सिटी येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सफाई करण्यासाठी उतरलेल्या चार सफाई कर्मचाऱ्यांचा जीव गेल्याने हळहळ व्यक्त केली जात होती. यात दोन सख्ख्या भावांचाही मृत्यू झाल्याने एकाच कुटुंबावर आघात झाला.

या घटनेनंतर पोलिसांनी सांडपाणी प्रकल्पाची देखभाल करणाया ठेकेदार कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली आहे, पण गुन्हा दाखल करण्याची कारवाई झाल्यानंतरही हा गंभीर विषय मार्गी लागेल का हा खरा प्रश्न आहे. कारण हा घटनेनंतर लगेचच म्हणजे १५ एप्रिलला वसई पूर्वेकडील एव्हरशाईन इंडस्ट्रीजमधील सांडपाण्याची टाकी साफ करण्यासाठी उतरलेल्या एका सफाई कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. विरार पश्चिम-ग्लोबल सिटी येथील २० ते २५ इमारतींकरिता रुस्तमजी या बांधकाम व्यावसायिकाने सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राची निर्मिती केली आहे.

या सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रात दीड ते दोन एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. या सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राच्या देखभाल-दुरुस्ती आणि साफसफाईची जबाबदारी नालासोपारास्थित पॉलिकॉन या एजन्सीला देण्यात आलेली आहे, मात्र या कामाचा अनुभव नसलेल्या या एजन्सीने मागील तीन महिन्यांपासूनच या केंद्राच्या देखभाल-दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. तेव्हापासून या केंद्राची व्यवस्थित काळजी घेतली जात नसल्याच्या तक्रारी होत्या.

परिणामी सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रात शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७), निखिल घाटाळ (२४) आणि सागर तेंडुलकर (२९) या चौघा मजुरांचे जीव गेल्याची घटना घडली. सुरक्षा साधने न घेताच पाण्यात उतरलेल्या या चौघांचा दूषित वायूमुळे गुदमरून मृत्यू झाल्याचे उजेडात आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे टाकीत उतरलेला एक कर्मचारी बाहेर येत नाही, असे पाहून एकापाठोपाठ तब्बल चार जण आपल्या सहकार्याच्या मदतीसाठी टाकीत उतरले होते. दुर्दैवाने चौघांचाही मृत्यू झाला. यावरून सांडपाणी प्रकल्पाची देखभाल करणाऱ्या

कंपनीचा हलगर्जीपणा समोर आला आहे.

पॉलिकॉन एजन्सीने मजुरांच्या जीविताची काळजी घेणारी कोणतीही उपाययोजना केलेली नव्हती. आर्थिक बचत करण्याच्या प्रयत्नात या चौघांचे बळी घेतलेले आहेत. संबंधित बांधकाम व्यावसायिकानेही आर्थिक बचतीसाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्राची देखभाल-दुरुस्ती आणि सफाई कमी पैशात करेल अशा एजन्सीला काम दिल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे निर्मितीपासूनच सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्र वादात सापडलेले होते. या सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राशेजारी शाळा असल्याने विद्यार्थ्यांनी दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी केलेल्या होत्या. त्यामुळे मुलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होईल, असा आक्षेप घेत त्याला विरोध करण्यात आलेला होता, मात्र बांधकाम व्यावसायिकाचीच शाळा असल्याने पालक थेट तक्रार करू धजावत नव्हते, अशी माहिती परिसरातील रहिवाशांनी दिली आहे.

ही घटना ताजी असतानाच १५ एप्रिलला सांडपाण्याच्या टाकीची साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या एका सफाई कामगाराचा गुदमरून मृत्यू झाला आहे. वसईच्या चिंचपाडा येथील एव्हरशाईन इंडस्ट्रीच्या सांडपाण्याची टाकी साफ करण्यासाठी दुपारी तिरुपती भुट्टे (३३) या सफाई कामगाराला बोलावण्यात आले होते. दुपारी तीनच्या सुमारास कुठल्याही सुरक्षेच्या साधनांशिवाय तो टाकीत उतरला होता, मात्र टाकीतील विषारी वायूमुळे त्याचा श्वास गुदमरून तो बेशुद्ध झाला. त्याला उपचारासाठी आधी आयकॉन या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

नंतर प्रकृती खालावल्याने महापालिकेच्या सर डी. एम. पेटिट रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. राज्य शासनाच्या 'सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज' या कार्यक्रमांतर्गत हाताने मैला व मलःजल वाहिन्या (भुयारी गटार) सफाई करण्यावर राज्य सरकारने बंदी घातली आहे. शहरातील कोणत्याही नागरिकांनी त्यांच्या इमारतीच्या, घराच्या किंवा वाणिज्य इमारतीच्या मैला टाकी सफाई करण्यासाठी कोणत्याही खासगी सफाई कामगारांकडून मानवीयरीत्या सफाई करून घेऊ नये.

मैला टाकीची मानवीयरीत्या सफाई करणे धोकादायक आहे. यामुळे संबंधित कामगाराचे प्राण जाऊ शकतात. अशा प्रकारचे काम करताना आढळल्यास संबंधित काम करून घेणाऱ्या तसेच करणाया नागरिक अथवा संस्था-संघटना यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असे आदेश राज्य सरकारने दिलेले आहेत, मात्र हा आदेश धुडकावत वसई-विरार शहरात अकुशल सफाई कर्मचायांकडून अशी कामे करून घेतली जात असल्याचे दिसून येते.

एकतर अकुशल कामगार कमी पैशात उपलब्ध होतात. त्यांच्या कोणत्याही साधनसामुग्री अथवा सुरक्षितेतची काळजी घेण्याची गरज वाटत नाही. वसई-विरार शहरात भुयारी गटारे, सेफ्टीक टँक, सांडपाणी प्रकल्प यांची स्वच्छता मानवी पद्धतीने करवून घेण्याचे प्रकार सुरूच आहेत. कोणत्याही प्रकारच्या सुरक्षेच्या साधनांविनाच ही स्वच्छता केली जात आहे. यामुळे विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू होण्याच्या घटना वाढत असून सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गटारात असे खेदाने म्हणावे लागत आहे. असे प्रकार रोखण्यासाठी खासगी इसमांकडून मानवी पद्धतीने मैला टाकी साफ करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे, मात्र या नियमाकडे सर्रास दुर्लक्ष करून मानवी पद्धतीने भूमिगत गटारे आणि सेफ्टीक टँकची साफसफाई केली जात आहे. सुरक्षेच्या साधनांचा वापर केला जात नसल्याने टाकीत तयार होर्णाया विषारी वायूचा मोठा परिणाम हा सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. काही वेळा या विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू होण्याच्या घटना समोर येत आहेत.

अशा दुर्घटना होऊ नयेत यासाठी वसई-विरार महापालिकेच्या हद्दीत कोणत्याही खासगी सफाई कर्मचाऱ्याकडून सेफ्टीक टँक साफ करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. त्यासाठी महापालिकेने स्वतःची यंत्रणा निर्माण केली आहे. टाक्यांची स्वच्छता करण्यासाठी महापालिकेकडे अत्याधुनिक उपकरणे व प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी आहेत. महापालिकेने प्रत्येक प्रभागासाठी मैला स्वच्छता वाहने व सक्शन पंप वाहने खरेदी केली आहेत. महापालिकेकडून शहरवासीयांना यासंबंधी वारंवार जागृतही केले जात असते.

पण कमी पैशांच्या आमिषाने महापालिकेचा मनाई आदेश झुगारून खासगी सफाई कर्मचाऱ्यांकडून सेफ्टीक टँक साफ करून मनाई आदेश धुडकावले जात असल्याचे पाहावयास मिळते. हाताने मैला उचलणाऱ्या कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ या कायद्यान्वये पहिल्यांदा गुन्हा केल्यास दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास अथवा दोन लाख रुपये दंड अथवा दोन्हीही शिक्षा संबंधित गुन्हेगारास होऊ शकतात. असा गुन्हा पुन्हा घडल्यास संबंधितावर पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास अथवा पाच लाख रुपये दंड अथवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात.

वसई-विरार महापालिका हद्दीत अनेक मोठमोठी निवासी, वाणिज्य संकुले तयार झाली आहेत. त्या ठिकाणी स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक असल्याने केले जात आहेत, मात्र सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या देखभाल-दुरुस्तीकडे गंभीरपणे पाहिले जात नाही. प्रकल्पाच्या देखभाल-दुरुस्तीची कंत्राटे खासगी कंपन्यांना दिली जातात. ठेकेदार आर्थिक फायद्यासाठी दुरुस्तीची कामे करताना दिसत नाहीत. महापालिकेकडून अशा प्रकल्पांचे नियमितपणे ऑडिट करण्याची नितांत गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. कायद्याचा धाक नसल्यानेच ठेकेदार सफाई कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात घालत आहेत. राज्य सरकारने लागू केलेल्या कायद्याची कडक अंमलबजावणी महापालिकेने करण्याचीही नितांत गरज आहे.

लग्नविधींमध्ये मोलाची भूमिका बनवणारी धवलारीन आजही उपेक्षित

शहापूर : लग्न समारंभात विविध समाजाचे बांधव आपापल्या रूढी परंपरा आपल्या देवदेवतांचे विधिवत पूजन करून लग्न कार्य सिद्धीस नेत असतात. नुकताच त्यांच्या समाजाप्रती असलेले योगदान लक्षात घेऊन शहापूर तालुक्यातील धवलारीन महिलांचा शोध घेऊन वृषाली महिला संस्थेकडून या धवलारीन वृद्ध महिलांचा कृतज्ञता सोहळा पार पडला.

लग्न समारंभामध्ये परिस्थितीनुसार खर्च नागरिक करीत असतात. मात्र लग्न समारंभामध्ये लग्नाच्या तिर्सया दिवसाअगोदर लग्न कार्याच्या उटणे, हळदी, तेलं तसेच पाठवणीपर्यंत तीन दिवस देवदेवतांना आपल्या गायनातून स्तवन, नमन करून धवलारीन

महिला लग्न समारंभात हयातभर निस्वार्थ भावनेने योगदान देतांना दिसून येतात. लग्न समारंभामध्ये कोरोना काळात अनेकांनी लग्न समारंभातील खर्चाला आळा घालून मोजक्या पाहुण्या मंडळींबरोबर लग्न समारंभ उरकले. कोरोना काळानंतर पुन्हा एकदा लग्न समारंभाची धूम आपणांस पाहावयास मिळत आहे. यामध्ये लग्न मंडप, वाजंत्री, निमंत्रण पत्रिका, मानपणाचे कपडे, नवरा नवरी साठी दागिने या रूढी आणि परंपरा जपण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च होत आहे. लग्न समारंभामध्ये जेवढा मान ब्राह्मणाला दिला जातो. तेवढाच मान उटणे, हळदी, तेलं यामध्ये आपल्या गायनातून देवदेवतांचे नामस्मरण करून संस्कृती व परंपरा जपर्णाया वयोवृद्ध धवलारीनी देखील आहेत. त्यांचीही सेवा आजही उपेक्षित असून नवीन पिढीला न रुचणारी आहे. धवल गीत गार्णाया अनेक वयोवृद्ध महिला काळाच्या पडद्याआड गेल्या असून नवीन पिढीमध्ये ही संस्कृती आणि परंपरा लोप होतांना दिसून येत आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एसटीच्या नऊ हजार बस धावणार
महामंडळाच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची भर

मुंबई : देशात सात टप्प्यांत, तर महाराष्ट्रात पाच टप्प्यांत लोकसभा निवडणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर मतदानाचे यंत्र, साहित्य व मतदान पथकांना मतदान केंद्रापर्यंत नेऊन सोडण्याचे आणि निवडणूक मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर त्यांना परत घेऊन आणण्याची जबाबदारी राज्य परिवहन (एसटी) महामंडळावर सोपविण्यात आली आहे. यासाठी एसटी बसचे आरक्षण करण्यात

आले असून, राज्यातील पाच टप्प्यांतील मतदानासाठी सुमारे नऊ हजार एसटी बस धावत आहेत.

एसटी महामंडळाला प्रत्येक बसमागे २४ ते ३० हजार रुपये मिळणार आहेत. दोन टप्पे झालेत. आता राज्यात तिसरा टप्पा हा ७ मे रोजी होणार असून यात ११ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. राज्यात मतदानाचा चौथा टप्पा १३ मे रोजी पार पडणार आहे.

पाचव्या टप्प्यात २० मे रोजी एकूण १३ मतदारसंघांत मतदान होत असून, मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघासाठी १२७ बसचे आरक्षण करण्यात येणार आहे. पालघर २५४ बस, ठाणे, भिवंडी, कल्याण ६५ बस, नाशिक आणि दिंडोरी ५१५ बसची मागणी करण्यात आली आहे. धुळ्यासाठी २०० बसची मागणी एसटी महामंडळाकडे केली आहे .

मतदानापूर्वी प्रशासनाने सर्वच तयारी पूर्ण केली आहे. निवडणुकीच्या कामात व्यत्यय येऊ नये, यासाठी मतदानाच्या दिवशी आणि आदल्या दिवशी एसटी बसची फेरी धावणार आहे.

Soldiers injured after terrorists open fire on two security vehicles in Poonch

NEW DELHI :

Three to five Air Force personnel were injured in J&K's Poonch on Saturday after their security vehicle was fired upon by terrorists. The officials said the firing was reported from the Sanai village of Surankote and reinforcements from the Army and police have been rushed to the area to ascertain the details. A gunfight ensued between the suspected terrorists and security forces near a government higher secondary school in Gursai Moori of Medhat sub-division in Poonch.

A defence spokesperson said that a firing incident took place but exact details were awaited. "An Indian Air Force vehicle convoy was attacked by militants in the Poonch district of J&K, near Shahsitar. Cordon and search operations are underway presently in the area by local military units. The convoy has been secured, and further investigation is under progress," IAF said in a statement. The local Rashtriya Rifles unit has started cordon and search operations in the area. The vehicles have been secured inside the air base in the General area near Shahsitar.

Unconfirmed reports stated that armed terrorists opened fire on an MES and IAF vehicle near the government school prompting the security forces to retaliate.

Poonch, part of the Anantnag-Rajouri-Poonch Lok Sabha constituency, where the polling has been rescheduled by the EC, will now go to the polls on May 25.

Jammu and Kashmir Police launched a search operation after receiving information about the suspicious movement of two individuals on Friday.

Earlier, Border Security Force (BSF) personnel in the Samba sector were put on high alert after the security forces thwarted a potential infiltration attempt along the International Border in the Samba district.

The intruder was gunned down by the forces while he tried to approach the BSF fences on the international border in the early hours of Wednesday.

"In the intervening night of May 1 and 2, 2024, the vigilant BSF troops observed a suspicious movement across the IB in the Samba border area, & an intruder was observed approaching towards the BSF fence. The alert troops neutralised one intruder & thwarted the infiltration ttempt," the Border Security Forces said in an official release.

Chardham Yatra 2024
Offline registrations to start from May 8

NEW DELHI :

Offline registrations for the Chardham Yatra 2024 will start at Haridwar and Rishikesh from May 8, 2024. The offline registrations will be done at Rahi Motel in Haridwar and Yatra Registration Office & Transit Camp at Rishikesh.

Daily ceiling limit for offline registration per dham has been fixed at 1000 at Rishikesh and 500 at Haridwar. The Chardham Yatra 2024 is set to start from May 10 on the occasion of Akshaya Tritiya. The Chardham Yatra is expected to run till November. Under the Chardham Yatra, devotees and pilgrims from across the world visit the four Hindu shrines- the Yamunotri, the Gangotri, the Kedarnath and the Badrinath. In order to ensure the proper management and conduct of the Chardham Yatra 2024, Uttarakhand Chardham Teerth Purohit Mahapanchayat has nominated 2 Teerth Purohits from each Dham to coordinate with the Uttarakhand Tourism Department. Pt. Puroshttam Uniyal and Pt. Aniruddh Uniyal from Yamunotri, Pt. Rajnikant Semwal and Pt. Nikhilesh Semwal fromGangotri, Pt. Santosh Trivedi and Pt. Pankaj Shukla from Kedarnath and Pt. Brijesh Sati & Pt. Praveen Dhyani from Badrinath have been nominated by the Mahapanchayat. The Chardham Yatra is held every year and holds deep religious importance for the Hindus. The word "Chardham" is derived from two Hindi words- 'Char' meaning four, and 'Dham' meaning religious places. So the name Chardham Yatra literally means religious pilgrimage to the four Hindu shrines- the Yamunotri, the Gangotri, the Kedarnath and the Badrinath.

JD(S) leader HD Revanna taken into custody by SIT in kidnapping case

NEW DELHI :

JD(S) leader HD Revanna, whose son is accused of sexual assault and rape, was taken into custody by SIT officials on Saturday in connection with a kidnapping case. The kidnapping case was registered by the victim's family at the KR Nagar police station, in Bengaluru.

HD Revanna's son Prajwal Revanna is facing multiple charges of sexual abuse. He was picked up by the officials of the Special Investigation Team after a court rejected his anticipatory bail plea.

The case was registered against Revanna, a former Minister and son of JD(S) patriarch and former Prime Minister H D Deve Gowda and his confidant Sathish Babanna in Mysuru on Thursday night for allegedly abducting a woman, who is also reportedly a victim of alleged sexual abuse by his son and MP Prajwal Revanna.

The complaint of kidnapping was filed by the son of the victim

woman, who has now been tracked down by the Karnataka police. It is likely that she will soon speak to the SIT officials.

Earlier today, a special court for People's Representative in Bengaluru rejected the interim bail application of JD(S) leader HD Revanna and JD(S) MP Prajwal Revanna in connection with the alleged "obscene videos" case.

According to the kidnapping case filed against HD Revanna, the woman worked at the JD(S) leader's house for almost five years, and had quit three years ago. Her son alleged in the complaint that the woman was picked up by Revanna's aid on April 26 and had been missing since.

The son later discovered a video of alleged sexual abuse of her mother by incumbent MP and Hassan Lok Sabha candidate Prajwal Revanna. He alleged in his complaint that soon after the video was discovered, his mother went missing.

The Holenarsipura MLA and his associate were booked under Sections 364A (kidnapping for ransom), 365 (kidnapping with intent to cause harm), and 34 (common intention) of the IPC. The FIR, registered by KR Nagar police, also lists HD Revanna as accused number one and another man, identified as Babanna, as accused number two.

उल्हासनगरात डान्सबारच्या मालकावर प्राणघातक हल्ला

पोलिसांकडून ५ जणांना अटक

■ **उल्हासनगर** : उल्हासनगरात डान्स बारच्या मालकावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडली. विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले असून याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

उल्हासनगरच्या श्रीराम चौक हा डान्स बारमुळे बदनाम झालेला आहे.या चौकात हंड्रेड डेज, पल, राखी हे डान्सबार आहेत. या डान्सबारमध्ये यापूर्वीही अनेक वेळा कायदे आणि नियम धाब्यावर बसून बारबाला नाचवल्याबाबत स्थानिक विठ्ठलवाडी पोलीस तसेच बाहेरून आलेल्या पथकांनी कारवाई केलेली आहे. या डान्सबार वाल्यांमध्ये अनेकवेळा विविध कारणांवरून वाद होऊन त्याचे पर्यावसान हाणामारीत होत असते. असे असले तरी हे डान्सबार कायमस्वरूपी बंद करण्यासाठी स्थानिक पोलीस तथा राज्य उत्पादन विभागाकडून कारवाई केली जात नाही. यामागे मोठे अर्थकारण असल्याचे दिसून येत आहे.विशाल उर्फ रतन शुक्ला याने दोन दिवसांपूर्वीच सत्यम बारमधील नोकरी सोडून हंड्रेड डेज बारमध्ये काम करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे दोन्ही बारच्या व्यवस्थापकांमध्ये मतभेद निर्माण झाले होते.रात्रीच्या सुमारास दोन्ही पक्ष हंड्रेड डेज बारजवळ चर्चेसाठी एकत्र आले. ज्यामध्ये हंड्रेड डेजच्यावतीने मालक सनी वसिटा, वाहिद शेख, मुन्ना यादव आणि रतन शुक्ला आणि सत्यम बारच्यावतीने अन्नू केदार, त्याचे मित्र विशाल मोहिते आणि आकाशसिंग लबाना आले होते.

दरम्यान दोन्ही गटात वाद झाला. त्याचे पर्यावसान हाणामारीमध्ये झाले.संधीचा फायदा उचलत अन्नू केदारने कमरेला खोचलेला चाकू सनीच्या गळयावर मारला. परंतु सनीने वार चुकवल्याने गळयाच्या खाली जखम झाली. पुन्हा एकदा अन्नू केदारने सनीवर चाकूने वार करून पोटात चाकू भोसकला. तसेच विशाल मोहिते आणि आकाश सिंग लबाना यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. सनीचे सहकारी वाहीद शेख, विशाल उर्फ रतन शुक्ला, मुन्ना यादव हे सनीला वाचवण्यासाठी पुढे आले असता अन्नू केदार याने त्यांना चाकू दाखवून कोई आगे आया तो खल्लास कर दूंगा, अशी जिवे ठार मारण्याची धमकी दिली. जखमी असलेल्या सनी वसिटाला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सनी वसीटाने दिलेल्या फिर्यादीवरून अनु केदार, विशाल मोहिते आणि आकाशसिंग लबाना याना अटक करण्यात आली आहे.

■ त्यानंतर सनीच्या मित्रांनी अन्नू केदारवर हल्ला केला होता .त्यामुळे पोलिसांनी सनी वसिटा, वाहिद शेख, मुन्ना यादव, रतन शुक्ला यांच्या विरोधात अन्नू केदार याच्या फिर्यादीवरुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

■ विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ, पोलीस निरीक्षक विक्रम गौड यांच्या पोलीस पथकाने तत्काळ दोन्ही गुन्ह्यातील मिळून पाच जणांना अटक केली आहे . उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे . मात्र डान्सबारमुळे वाढलेली गुन्हेगारी ही विठ्ठलवाडी पोलिसांच्या डोक्याला ताप झाली आहे .

मांसाची अवैध वाहतूक करणारे गजाआड

■ **भिवंडी** : मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी जवळील रांजणोली नाक्यावर पोलिसांनी पहाटे साडेचार वाजता गोवंशाचे मांस मुंबईला विक्रीसाठी घेऊन जाणारा निळ्या रंगाचा टेम्पो पकडला आहे.या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. टेम्पो चालक रोहन प्रवीण शिंदे(२१) व त्याचा साथीदार शाहिद जरीफ शेख (२०) या दोघांना अटक केली करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे दोघे मुंबई येथे राहणारे असून मोठया टेम्पोत अवैधरित्या गोवंशाचे मांस घेऊन मुंबई येथे विक्रीसाठी घेऊन जात होते.पोलिसांनी गस्त घालीत असताना पहाटे सुमारास हा टेंपो अडवून तपासणी केली असता टेम्पोत अवैधरित्या गोवंशाचे मांस घेऊन जात असल्याचे तपासणीत उघड झाले. त्यामुळे या प्रकरणी पोलीस शिपाई अच्युत गायकवाड यांनी भिवंडीतील कोनगाव पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक केली आहे. निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर अशा कारवाईला वेग आला आहे. त्यामुळे असे कृ त्य करणारे धास्तावले आहेत.

दुकानाचे शटर उचकटून रोकड चोरली

■ **ठाणे** : ठाण्याच्या चरई परिसरातील कपड्याच्या दुकानाचे शटर कुलूप उचकटून अज्ञात चोरट्याने दुकानाच्या गल्ल्यातील रोकड लांबवली. ही घटना मंगळवार रात्री घडली.तुषार सुनिल यादव यांचे ठाण्यात चरई येथे कपडे विक्रीचे दुकान आहे. हिशोब करून दुकानाच्या गल्ल्यात १० हजाराची रक्कम ठेऊन दुकान बंद केले. बुधवारी सकाळी दुकानाच्या शटरचे कुलूप कोणीतरी तोडलेले आढळले. दुकान उघडल्यावर दुकानामधील कॅश काऊंटरमधील दहा हजाराची रक्कम चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले.नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टोकावडेत हातभट्टीचा अड्डा पोलिसांकडून उध्वस्त

■ **मुरबाड** : मुरबाड -कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या टोकावडे वेळुक गावच्या हद्दीतील शाई नदीचे पात्राच्या बाजूला असलेला गावठी दारूचा अडडा उध्वस्त केला. एकुण १६०० लिटर गावठी हातभट्टीची दारु बनवण्याचे साहित्य पोलीसांनी जागीच नष्ट केले. पोलीसांच्या कारवाईने या परिसरात गावठी हातभट्टी दारू तयार करण्यामध्ये भीती वातावरण निर्माण झाले आहे.टोकावडे पोलिस ठाण्याच्या , हद्दीतील वेळू गावाच्या हद्दीत शाही नदीच्या पात्राच्या बाजूला धाड टाकण्यात आली.

लोकलमध्ये हाणामारी एकाचा मृत्यू; दोघांना अटक

■ **कल्याण**: लोकल ट्रेनमध्ये धक्का लागल्याने अथवा जागेवरून भांडणे होण्याचे प्रकार नेहमीच घडत असतात. मात्र क्षुल्लक कारणावरून एका गटाने दुसऱ्या गटाला केलेल्या बेदम मारहाणीत एका प्रवाशाला आपला जीव गमवावा लागल्याची घटना घडली आहे.दत्तात्रय भोईर (५५) असे मृत प्रवाशाचे नाव असून याप्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे.

शहापूर तालुक्यातील साजिवली येथे राहणारे दत्तात्रय भोईर आणि प्रदीप सिरोशे हे २७ एप्रिल रोजी त्यांच्या दोन मित्रांसोबत उल्हासनगरमध्ये हळदी समारंभासाठी आले होते. कार्यक्रम आटोपून चौघांनी घराकडे परतण्यासाठी शहाड रेल्वे स्थानकातून शेवटची कसारा लोकल पकडली.आंबिवली स्थानकामध्ये चार जणांचा आणखी एक गटाने त्याच डब्यामध्ये प्रवेश केला.यानंतर दत्तात्रय भोईर आणि प्रदीप सिरोशे यांची त्यांच्या मित्रांसोबत थट्टामस्करी सुरू होती.पण ही मंडळी आपल्यालाच पाहून हसत असल्याचा गैरसमज दुसऱ्या गटाला झाला.ते आपल्यालाच चिडवत असल्याच्या गैरसमजातून सुरू झालेल्या वादातून एका गटाने दुसऱ्या गटावर कमरेचा पट्टयाने व धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केला. यामध्ये दत्तात्रय भोईर आणि प्रदीप सिरोशे गंभीर जखमी झाले होते. त्यांना खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र गुरूवारी दत्तात्रय भोईर यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.अमोल महावीर परदेसी (४०. रा. शहापूर) आणि तनुज रवींद्रकुमार जम्मुवाल (२१ रा. वशिंद)अशी हल्लेखोरांची नावे असून त्यांना रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे.

देहरजा नदीवरील पुल दुरुस्तीच्या कामाला सुरुवात

वाडा मनोर रस्त्यावरील बंद असलेली अवजड वाहतूक नदी पात्रातील रस्त्यावरून सुरू होणार

■ **बोईसर** : महिनाभराच्या प्रतिक्षेनंतर मनोर वाडा रस्त्यावरील देहरजा नदीवरील कमकुवत झालेल्या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे.पुलाच्या दुरूस्तीच्या कामाचे साहित्य आणि मजूर पुलाच्या ठिकाणी पोहोचले आहेत.गुरुवार पासून पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी दिली. पुलावरून बंद ठेवण्यात आलेली अवजड वाहतूक देहरजा नदी पात्रात भराव करून रस्ता तयार केलेल्या रस्त्यावरून वाहतूक सुरू केली जाणार आहे.त्यामुळे गेल्या महिनाभरापासून गैरसोय सहन करणाऱ्या अवजड वाहतूकदारांना दिलासा मिळणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुलाच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी शासनाकडे पाठवण्यात आले आहे. मनोर वाडा रस्त्यावरील टेन गावच्या हद्दीतील देहरजा नदीवरील ब्रिटिशकालीन बांधकाम असलेला पूल कमकुवत झाल्याचे निदर्शनास आल्याने ३१ मार्च २०२४ पासून अवजड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता.मनोर वाडा रस्त्यावरील अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली होती.देहेरजा नदीवर टेन गावच्या हद्दीतील ब्रिटिश कालीन पुलाच्या दुरुस्तीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाचे पूल तज्ञ विकास रामगोटे यांनी भिवंडी उपविभाग आणि पालघरच्या कार्यकारी अभियंत्यांच्या उपस्थितीत पाहणी केली होती.यावेळी टेन बाजूकडून तिसऱ्या कमानी दरम्यानच्या स्लॅब आणि कठडा खचल्याचे आढळून आले.पाहणी नंतर दुरुस्तीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पालघर उपविभागाकडून दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

■ पूल नादुरुस्त झाल्याने माल वाहतूक करताना वेळेसह वाहतूक खर्चात वाढ होणार असल्याने उद्योजक संकटात सापडले आहेत .पुलाच्या दुरुस्तीसाठी अडीच ते तीन महिन्यांचा अवधी लागणार असल्याने उद्योजकांना मोठया नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे .इंधन दरवाढ आणि विजेच्या दरवाढीमुळे मेटाकुटीला आलेले उद्योग मनोर वाडा रस्त्यावरील वाहतूक बंदीमुळे वाढणाऱ्या खर्चामुळे उद्योजकांच्या अडचणीत वाढ होणार आहे .

■ पुलाच्या दुरुस्तीच्या कामा दरम्यान वाहतूक सुरु ठेवण्यासाठी छोटया नदी पात्रात भराव करून रस्ता करण्यात आला आहे .रस्ता तयार करण्यासाठी मुंबई बडोदा द्रुतगती महामार्गाच्या ठेकेदार जी आर इन्फ्रा कंपनीच्या वायब्रेटर रोलर,ग्रेडर आणि ट्रक आदी यंत्र सामग्रीचा वापर करण्यात आला .

टिटवाळा, अंबरनाथ आणि वाड्यात वीज चोरी उघडकीस

वाडा उपविभागात तब्बल १०४ जणांविरूद्ध कारवाई

■ **कल्याण** : एप्रिल महिन्यात महावितरणच्या टिटवाळा, अंबरनाथ पूर्व आणि वाडा उपविभागात वीज चोरांविरू द्ध धडक कारवाई करण्यात आली. टिटवाळा उपविभागात १२४ जणांविरूद्ध कारवाई करून ४१ लाख रूपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. अंबरनाथ पूर्व उपविभागात मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्या १९ ग्राहकांकडे २६ लाख ३५ हजार रू पयांची वीजचोरी आढळून आली. तर वाडा उपविभागात तब्बल १०४ जणांविरू द्ध कारवाई करण्यात आली असून १ कोटी ९ लाख रू पयांची वीजचोरी उघडकीस आली आहे.

मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात वीज चोरांविरूद्ध धडक कारवाई सातत्याने सुरू आहे. त्यानुसार टिटवाळा उपविभागातील जीआर नगर, बल्याणी गाव, आंबिवली रोड, वैष्णवी देवी चाळ, गुरू वली पाडा, शिवनगरी चाळ भागात एकाच दिवशी राबवलेल्या शोध मोहिमेत १२४ जणांकडे सुरू असलेल्या वीजचोऱ्या शोधण्यात यश आले.

या १२४ जणांकडून सुमारे ४१ लाख रूपये किंमतीची १ लाख ८० हजार ८८१ युनिट विजेची चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहाय्यक अभियंता तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे यांच्या पथकांने ही कारवाई केली.अंबरनाथ पूर्व उपविभागात ३३३७ ग्राहकांच्या वीज मीटरची तपासणी करण्यात आली. यात १९ वीज मीटरमध्ये फेरफार करण्यात आल्याचे आढळून आले. या १९ ग्राहकांनी २६ लाख ३५ हजार रू पये किंमतीची ९८ हजार ९९६ युनिट विजेची चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र प्रजापती, सहाय्यक अभियंते वैशाली पाटील, प्रशांत नाहीरे, हरेश विशे, प्रतिक म्हात्रे, मोहित ठाकुर, रविंद्र नाहिदे, सहायक लेखापाल मयुरी बोरसे यांच्या पथकांनी ही कारवाई केली.

■ तर वाडा उपविभागात वाडा शहर आणि ग्रामीण, गोऱ्हा, अंबाडी, कुडूस आदी भांगामध्ये राबवण्यात आलेल्या शोध मोहिमेत १०४ जणांकडे विजेचा चोरटा वापर आढळून आला. या १०४ जणंनी १ कोटी ९ लाख रू पयांची वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

■ संबंधितांना चोरीच्या विजेचे देयक आणि तडजोडीची रक्कम भरण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या असून विहित मुदतीत या रकमेचा भरणा टाळणाऱ्यांविरूद्ध गुन्हे दाखल होण्यासाठी पोलिसांत फिर्याद देण्यात येणार आहे. वाड्याचे उपविभागीय अभियंता अविनाश कटकवार, सहायक व कनिष्ठ अभियंते, जनमित्र तसेच सुरक्षारक्षक यांच्या टिमने ही कामगिरी केली.

अनधिकृत बॅनर्स,पोस्टर्स पालिकेच्या रडारवर

■ **भिवंडी** : लोकसभेच्या निवडणुकीसाठी परवानगी न घेता बेकायदेशीरपणे बॅनर,पोस्टर लावणाऱ्यांच्या विरोधात भिवंडी महापालिका कडक झाली असून, शहरातील विद्युत खांब आणि भिंतींवर बेकायदेशीरपणे बॅनर, पोस्टर लावल्याच्या तक्रारीनंतर प्रशासनाने ते हटवून निजामपूरा पोलिस ठाण्यात अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असतानाही शहरात बेकायदा बॅनर आणि पोस्टर्स लावल्याची तक्रार भिवंडी महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्याकडे आली होती.याची दखल घेत आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना आपापल्या प्रभागात बेकायदेशीरपणे लावलेले सर्व बॅनर पोस्टर्स तत्काळ हटवण्याच्या सूचना दिल्या होत्या.याशिवाय शहरात अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले आहेत.याच अनुषंगाने प्रभाग समिती क्रमांक पाचचे सहाय्यक आयुक्त बाळाराम जाधव यांनी त्यांच्या परिसरात भेट देऊन कारवाई करून विद्युत खांबांवर बेकायदेशीरपणे लावलेले बॅनर पोस्टर जप्त केले.यासह बॅनर,पोस्टर लावणाऱ्या अज्ञातांच्या विरोधात महानगरपालिका अधिनियमाच्या विविध कलमान्वये निजामपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मालुमा इंग्लिश प्रायमरी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, गारमेंट वन गेट फ्री आणि आदर्श बालवाडी गर्ल्स इन्स्टिट्यूट नावाचे पोस्टर व बॅनर रस्त्यावरील विद्युत खांबावर बेकायदेशीरपणे लावल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शहापूर तालुक्यात उष्माघाताचे प्रमाण अधिक !

■ दररोज १० रुग्णांवर ग्रामीण रूग्णालयात उपचार

■ **शहापूर** : मागील गेल्या १५ दिवसांपासून शहापूर तालुक्यात उन्हाच्या तीव्र तापमानाचा पारा ४२ ते ४३ अंश सेल्सिअसपर्यंत वाढला आहे. या रखरखीत उन्हाचे सर्वाधिक चटके शेतात काम करणारे शेतकरी तसेच उघड्यावर काम करणाऱ्या मजुरांना सर्वाधिक बसत आहेत. शहापूर तालुक्यात दररोज उष्माघाताचा त्रास होणारे कमाल १० रूग्ण शहापूर उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल होत आहेत. शहापूर तालुक्यात गेल्या आठवड्यापासून तापमानाचा आकडा ४३ अंशापर्यंत पोहचला आहे. तापमान वाढत असले तरी पावसाळाही तोंडावर येऊन ठेपला आहे. पावसाळ्यापूर्वीची खरीपाच्या तयारीची शेताच्या बांध दुरूस्तीची कामे तसेच ट्रॅक्टरने उखळून ठेवलेल्या जमिनीतील मातीच्या ढेपी फोडण्याचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करायचे आहे. काही शेतकऱ्यांना राब करण्यासाठी जमीन भाजणीची कामे करायची आहेत. ही कामे एप्रिल ते मे या महिन्यांच्या कालावधीत केली जातात. या कामांसाठी शेतकरी व शेत मजूर आता अधिक संख्येने शेतात राबत आहेत. भर उन्हात काम करावे लागत असल्याने अगोदर पाणी पिऊन हैराण झालेला शेतकरी व मजूर उन्हाचा चटका वाढू लागतो तसे त्याच्या शरीरातील पाणी कमी होते.काही शेतकरी, मजुरांना शेतातच काम करत असताना चक्कर येते. काही शुध्द हरपून पडतात. अशा रुग्णांना त्यांचे नातेवाईक तातडीने सरकारी रुग्णालयात नेतात. तेथे प्राथमिक उपचार करून शहापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात आणतात. अशा रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर तातडीने उपचार केले जात आहेत. असे शहापूर उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयातील एका वैद्यकीय अधिकाऱ्यानी सांगितले. तापमान वाढल्यापासून उष्माघाताचे रुग्ण वाढण्याची शक्यता विचारात घेऊन उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तालुक्याच्या ग्रामीण भागातून दररोज उष्माघाताचा त्रास झालेले कमाल १० शेतकरी व मजूर उष्माघाताच्या त्रासाने दाखल होत आहेत. सुदैवाने जीवीत हानी करणारी घटना तालुक्यात घडलेली नाही.मात्र उन्हापासून संरक्षण करण्याच्या उपाययोजना अंमलात आणण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

> वाढत्या तापमानामुळे शहापूर ग्रामीण भागातून उष्माघाताचा त्रास झालेले काही रुग्ण दररोज प्राथमिक उपचार घेऊन शहापूर उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल होतात. त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करून ते सुस्थितीत होतील याकडे प्राधान्याने लक्ष दिले जाते.
> – डॉ.गजेंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय

हरवलेली व्यक्ती कुटुंबियांच्या सुखरूप स्वाधीन

■ठाण्यातील नौपाडा रक्षक टीमची उत्तम कामगिरी

■ **ठाणे** : नौपाडा रक्षक टीमच्या सजगतेमुळे हरवलेले वडिलांना त्यांच्या कुटुंबियांच्या सुखरूप स्वाधीन करण्यात यश आले आहे.घोडबंदर रोड येथील निळकंठ ठिकाणी राहणारे शंकर शेरीगर हे गृहस्थ सकाळी रस्ता विसरून निघाले.

ते गुरुद्वारा, भास्कर कॉलनी येथे आले व तिथून कोपरी ब्रिजजवळ जाऊन फुटपाथवर बसले होते. त्यांची अवस्था बघून कुणीच त्यांच्या सोबत बोलत नव्हता. ही बाब अभिनय कट्टयाच्या खानोलकर यांनी नौपाडा रक्षकचे किरण नाकती यांना सांगितली.

नौपाडा रक्षकचे स्वयंसेवक हे वृध्द बसले होते. त्या जागी पोहोचले. नौपाडा रक्षकने त्यांना विचारले असता त्यांनी गावचे नाव कर्नाटक येथील सांगितले.त्यांचा फोटो नाकती यांनी सोशल मीडियावर अभिनय कट्टा, श्री स्वामी समर्थ संस्कार साधना केंद्रच्या ग्रुपवर शेअर केला. तसेच त्या वृद्ध व्यक्तीला घेऊन अभिनय कट्टयावर आले. दरम्यान एका महिलेने नाकती यांनी फोन करून ते माझे वडील असल्याचे सांगितले.

त्यानंतर अभिनय कट्टयावर त्यांना घेण्यासाठी त्यांच्या मुली व नातेवाईक आल्यावर त्यांना त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी नाकती यांच्या समवेत विजय डावरे, संजय पवार, अशोक कदम, महेश सुतार यांनी मोलाची भूमिका बजावली. नौपाडा रक्षक टीमच्या वतीने गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत आठ वृद्धांना त्यांच्या कुटुंबियांच्या सुखरूप स्वाधीन करण्यात आले आहे.

एकाला वाचवण्याच्या प्रयत्नात तिघांनी गमावला जीव

■ **बदलापूर** : बदलापूरजवळील बारवी नदीमध्ये पोहण्यासाठी गेलेल्या अंबरनाथ येथील तीन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी संध्याकाळी समोर आली आहे. या या घटनेने तिन्ही तरुणांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. सध्या उकाडा वाढला असल्याने पर्यटक आणि तरुणांचा ओढा हा नैसर्गिक जलप्रवाहांकडे पोहण्यासाठी वाढला आहे. त्यात अंबरनाथ तालुक्यात चिखलोली, उल्हासनदी तसेच बारवी धरण आणि विविध खदानीमध्ये पोहण्यासाठी तरुण जात असतात. अशाच प्रकारे बुधवारी दुपारी अंबरनाथ पश्चिमेतील घाडगे नगर परिसरात राहणारे तिकेश मुरगु (२३) सुहास कांबळे आणि युवराज हुली (१८) हे तिघे मित्र बदलापूरजवळील बारवी धरणाच्या प्रवाहातील बारवी नदीत पोहण्यासाठी गेले होते; मात्र यावेळी पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने युवराज पाण्यात बुडू लागल्याने त्याला वाचवण्यासाठी सुहासने धाव घेतली; मात्र युवराज आणि सुहास दोघेही बुडत असल्याने त्यांना वाचवण्यासाठी गेलेला तिकेशही पाण्यात बुडाला. त्यामुळे एकमेकांना वाचवण्यासाठी गेलेल्या या तिन्ही मित्रांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत तिन्ही तरुणांचे मृतदेह बाहेर काढले होते. हे तिघे महाविद्यालयीन विद्यार्थी असल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी कुळगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आल्याची माहिती कुळगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि गोविंद पाटील यांनी दिली आहे.